## प्रेस नोट दिनांक २४/०६/२०१९

## रेकॉर्डवरील वाहन चोरीच्या सराईत गुन्हेगाराकडून युनिट १, गुन्हे शाखेच्या टिमने ०३ गुन्हे केले उघड

पुणे शहरातील वाहन चोरीच्या वाढत्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे युनिट १ गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी प्रट्रोलींग फिरत असतांना युनिट १ चे पोलीस कर्मचारी प्रशांत गायकवाड यांना त्यांचे गुप्त बातमी दाराकडून बातमी मिळालेवरून वाहन चोरीचे गुन्हे करणारा सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे योगेश ऊर्फ टकल्या नवनाथ वजाळे, वय २१ वर्षे, रा.घोरपडे वस्ती, लोणी काळभोर, ता.हवेली,जि.पुणे यास हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं. ४०२/२०१९ भादविक. ३७९ मधून ट्रासफर करून घेवून समर्थ पोलीस ठाणे गु.र.नं. ९५/२०१९ भादविक. ३७९ मध्ये अटक करण्यात आली आहे. त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याचेकडून हडपसर, समर्थ व दौंड पोलीस ठाणे कडील वाहन चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस आणून त्याचेकडून कि.रु. १,१०,०००/- च्या ०३ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. सदरच्या सराईत गुन्हेगारावर या अगोदर १६ वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई ही श्री. अशोक मोराळे साो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, व श्री राजेंद्र माहिते, पो.उप.निरी. हनुमंत शिंदे, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो.शि. प्रशांत गायकवाड, पो.हवा. प्रकाश लोखंडे, संजय बरकडे, अशोक माने, गजानन सोनुने, तुषार माळवदकर, स.पो.फौज. बाबा चव्हाण, विजेसिंग वसावे, पो.हवा. योगेश जगताप, सुभाष पिंगळे, सुधाकर माने, बशीर सय्यद, रिजवान जिनेडी, अनिल घाडगे, अजय थोरात, श्रीकांत वाघवले, वैभव स्वामी, तुषार खडके, सचिन जाधव, उमेश काटे, यांनी केली आहे.